# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०—२५६२१०५१
२५६२१०५३
ई—मेल: iqac@unipune.ac.in

अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष
गणेशखिंड, पुणे—४११००७.

संदर्भ क्र. आयक्युएसी/५३१/२०२२

दिनांक: ०९/०७/२०२२

## परिपत्रक २०१/२०२२

शिक्षण व्यवस्थेत परिवर्तन घडवून आणण्याच्या दृष्टीने तसेच सर्वांना दर्जेदार शिक्षण मिळण्याच्या दृष्टीने शासनाने 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' अंमलात आणण्याकरिता सूचना दिल्या आहेत. सदर धोरणाची काळजीपूर्वक आणि काटेकोर अंमलबजावणी आपापसातील सहयोगाने करणे अपेक्षित आहे.

त्याकरिता, प्रस्तुत विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभाग/केंद्रांमधील मा. विभागप्रमुख/मा. संचालक यांनी 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंमलबजावणी समिती' स्थापन करावी. सदरच्या समितीमध्ये आपल्या विभागातील अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्षाच्या कार्यासाठी निर्देशित केलेले विभागीय समन्वयक यांचा समावेश असणे आवश्यक आहे. तसेच, सदर समितीने संपूर्ण नियोजन, कार्यपध्दती आणि विद्यापीठ व शैक्षणिक विभाग/केंद्रांमध्ये या संदर्भातील कामकाजात समन्वय साधून 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' ची अंमलबजावणी यथायोग्य रितीने व्हावी. याकरिता, सदरच्या समितीमधील माननीयांचे नाव, पद, मोबाईल नंबर, ई—मेल आयडी इत्यादी माहिती अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्षास ई—मेलद्वारे पाठविण्यात यावी.

कृपया, 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' अंमलात आणणेबाबत भविष्यातील नियोजन, कार्यपध्दतीबाबतचा संपूर्ण अहवाल सोबत जोडलेल्या १६ मुद्दयांच्या अन्वये सदर समितीमार्फत अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष विभागाकडे **दि. ३० जुलै, २०२२** पर्यंत सादर करावा.

09/07/22

(डॉ. सुप्रिया पाटील)
मा. संचालक